॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/५०८ दिनांक २९/१२/२०२३

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: सन २०२३–२४ मधील विशेष वार्षिक शिबीरात बालविवाह थांबविण्यासाठी जनजागृती करण्याबाबत विशेष मोहिम राबविणे बाबत.**

संदर्भ: मा. राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी मंत्रालय कक्ष, मुंबई यांचे जा.क्र रासेयो–२०२३/प्र.क्र.२२७/रासेयो कक्ष दिनांक २१ डिसेंबर २०२३

महोदय,

उपरोक्त विषयी मा. राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय कक्ष, मुंबई यांनी संदर्भिय पत्रान्वये महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, धाराशिव, परभणी, नाशिक, जळगांव, धुळे व सोलापूर या १२ जिल्हयांमध्ये बाल विवाह थांबविण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्यात आले असून सदर कृती दल जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत आहे.

सन २०२३–२४ मध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या सात दिवसीय निवासी शिबीरांसाठी निवडलेल्या गावांत किंवा रासेयो ने दत्तक घेतलेल्या गावांत बालविवाह थांबविण्यासाठी, जनजागृती करण्याबाबत विशेष मोहिमेचे अयोजन करण्यात यावे. या मोहिमेत पथनाटय, भारूड, एकांकिका इ. उपक्रमांचा समावेश करण्यात यावा. बालविवाह प्रथा समाप्त करण्याच्या सामायिक उद्दिष्टांसाठी रा.से.यो. कडून पूरक वातावरण तयार करण्यात यावे. तसेच निवासी शिबीरांमध्ये एक दिवसीय बालविवाह थांबविण्याबाबतचे बौध्दिक सत्र घेण्यास महिला व बाल विभागाचे अधिकारी/कर्मचारी, युनिसेफ आणि सेंटर फॉर सोशल अँड बिहेवियर चेंज (SBC-3) ही संस्था या १२ जिल्हयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेस संपूर्ण सहकार्य करणार आहे असे कळविले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात सन २०२३–२४ मध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या सात दिवसीय निवासी शिबीरांसाठी निवडलेल्या गावांत किंवा रासेयो ने दत्तक घेतलेल्या गावांत बालविवाह थांबविण्यासाठी जनजागृती करण्याबाबत विशेष मोहिमेचे अयोजन करण्यात यावे व सदर मोहिमेत पथनाटय, भारूड, एकांकिका इ. उपक्रमांचा समावेश करण्यात यावा व त्या बाबतचा अहवाल मा. राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, मुंबई व क्षेत्रिय संचालक, पुणे यांना पाठवावयाचा असल्यामुळे आयोजित करण्यात आलेल्या सदरील उपक्रमांचा अहवाल,फोटो व व्हिडीओ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई–मेल वर न चुकता पाठविण्यात यावा, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.